अर्धसाप्ताहिक

# ब्रम्हपुरी समाचार

संपादक : अशोक भैया

RNI No. MAHMUL/2016/69789

E-Mail ID : bramhapurisamachar@gmail.com

Postal Regd. No. G2/47/CHD-283/2023-25

गुरूवार, दि. ०८ मे २०२५ | वर्ष १० वे | अंक ३९ वा | ब्रम्हपुरी | पाने ६ | किंमत २ रूपये

# एचएससी परिक्षेत ने.हि. महाविद्यालयाची सिध्दी पटेल जिल्ह्यात प्रथम

## ब्रम्हपुरी शिक्षणाचे माहेरघर असल्याचा पुन्हा एकदा प्रत्यय

**तालुक्याचा निकाल ९७.२८ टक्के**

ब्रम्हपुरी/महेश पिलारे

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या इयत्ता बारावी परिक्षेचा निकाल राज्यमंडळाने सोमवारला दुपारी ०१ वाजता ऑनलाईन पद्धतीने संकेतस्थळावर जाहीर केला. यात पूर्व विदर्भात शिक्षणाचे माहेरघर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ब्रम्हपुरी शहरातील नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालयाची वाणिज्य विभागाची विद्यार्थीनी सिद्धी अशोक पटेल हिने ९७.१७ टक्के गुण संपादित करीत तालुक्यात व जिल्ह्यातून प्रथम क्रमांक पटकाविला. तसेच स्मिता लोमेश तोंडरे ह्या विद्यार्थीनीने ९२.६७ टक्के द्वितीय तर ओम



सिद्धी अशोक पटेल
९७.१७ टक्के

प्रशांत बल्लेवार याने ९०.१७ टक्के गुण प्राप्त करून तृतीय स्थान मिळविले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयाची अनुष्का विनोद मेश्राम हिने ८८.६७ टक्के गुण प्राप्त करीत विज्ञान शाखेतून तालुक्यातून प्रथम येण्याचा मान पटकाविला. तर लोकमान्य टिळक महाविद्यालयाची विद्यार्थीनी रूतूजा जीवनदास भरडे हिने ८५.५० टक्के गुण संपादित करून कला शाखेतून तालुक्यातून प्रथम क्रमांक प्राप्त केला. नेत्रदिपक शैक्षणिक कामागिरीबद्दल नेवजाबाई भैया हितकारिणी शिक्षण संस्थेचे सचिव अशोक भैया तसेच ने.हि. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष शेकोकर यांनी

(उर्वरित पान क्र. ६ वर)

### 'सिध्दी'ला व्हायचं आहे सी.ए.

जिद्द, चिकाटी आणि कष्ट करण्याची इच्छा असेल तर आपण आपल्या जीवनात नक्कीच यशस्वी होऊ शकतो, असं म्हटलं जातं. याचाच प्रत्यय ब्रम्हपुरी शहरातील लाडकी लेक सिद्धी पटेल हिच्या यशाच्या माध्यमातून आला आहे. पूर्व विदर्भातील शिक्षणाचे माहेरघर म्हणून प्रचलित असलेल्या ब्रम्हपुरीतील नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालयाची विद्यार्थिनी सिद्धी अशोक पटेल हिने महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या इयत्ता बारावी परीक्षेत वाणिज्य विभागातून ९७.१७ टक्के गुण संपादित करून तालुक्यात व जिल्ह्यात प्रथम येण्याचा मान मिळविला. सिद्धी पटेलच्या या कामगीरीमुळे ब्रम्हपुरी तालुक्याच्या व नेवजाबाई भैय्या हितकारिणी शिक्षण संस्थेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

सिद्धी पटेल ही विद्यार्थीनी पहिल्यापासूनच हुशार विद्यार्थिनी म्हणून ओळखली जाते. तिचे शालेय शिक्षण ख्रिस्तानंद स्कूल ब्रम्हपुरी येथे झाले. दहावीतही तिने आपल्या हुशारीची चुणूक दाखविली होती. त्यावेळी तिने ९१ टक्के गुण मिळविले होते. दहावीत सर्वोत्कृष्ट गुण मिळाले असल्यामुळे तिने वाणिज्य शाखेत प्रवेश घेतला होता. महाविद्यालयातील शिकवणीवरच

(उर्वरित पान क्र. ६ वर)

# सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाने प्रशासक राज संपणार

ब्रम्हपुरी/का.प्र.

सर्वोच्च न्यायालयाने तब्बल ३ वर्षानंतर दिलेल्या निर्णयाने स्थानीय स्वराज्य संस्थांच्या निवडणूकींचा मार्ग मोकळा झाला आहे. येत्या ०४ महिन्यात निवडणूक घेण्याचे निर्देश न्यायालयाने राज्य सरकारला दिले आहे. गणेशोत्सवानंतरच निवडणूक होण्याची शक्यता आहे. २०२२ पूर्वीच्या ओबीसी लोकसंख्येच्या आधारावर निवडणूका घेण्यात येणार आहेत.

चंद्रपुर जिल्हयात एक जि.प., चंद्रपुर मनपा ब्रम्हपुरीसह भद्रावती, चिमूर, वरोरा, गडचांदूर, बल्लारपूर, राजूरा, मुल, नागभीड व घुग्गुस अशा १० नगरपालिका तसेच गोंडपिपरी, जिवती, कोरपना, पोंभुर्णा, सावली व सिंदेवाही अशा ६ नगर पंचायती आहेत.

०१ फेब्रुवारी २०२४ पासून ब्रम्हपुरी न.प.मध्ये प्रशासक राज सुरू आहे. न्यायालयाच्या निर्णयाने येत्या काही महिन्यातच प्रशासकराज संपून लोकप्रतिनिधींच्या हातात सत्ता येणार आहे. निवडणूक संदर्भातील निर्णयाने राजकीय नेते तथा कार्यकर्ते सक्रीय झाले आहेत. लवकरच मोर्चेबांधणीला सुरूवातदेखील होईल. याबाबत विविध मान्यवरांनी दिलेल्या प्रतिक्रिया...



**निवडणूक हा लोकशाहीचा आत्मा आहे. २०२२ पूर्वी ओबीसी लोकसंख्येचा आधार घेऊन निवडणूक होणार असल्याने तूर्त ओबीसींच्या राजकीय आरक्षणाचा प्रश्न सुटला आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचे स्वागत...**

**अशोक भैया - प्रथम नगराध्यक्ष व प्रसिध्द उद्योजक**



प्रा. अतुल देशकर
माजी आमदार

**काल सुप्रिम कोर्टाने दिलेला निर्णय हा लोकहिताचा होता. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या माध्यमातून लोकहिताचे निर्णय घेतले जातात. लोकप्रतिनिधींना स्थानिक प्रश्नांची पूर्ण माहिती असल्यामुळे त्यांच्या माध्यमातून अनेक प्रश्न सोडविण्यात येतात. त्यामुळे सुप्रिम कोर्टाच्या निर्णयाचे खुप खुप अभिनंदन.**



प्रमोद चिमूरकर
माजी
जि.प. सदस्य

**ग्रामीण भागाशी संबंधित सुप्रिम कोर्टाने घेतलेला निर्णय स्वागतार्ह. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणूका लांबणीवर गेल्यामुळे याचा फटका ग्रामीण भागाला बसत होता. जि.प. व पं.स.सदस्य यांची नाळ ग्रामीण भागाशी जोडली असल्यामुळे, सर्वसामान्यांच्या समस्या शासन दरबारी मांडण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणूका तातडीने घेण्यासंदर्भातील सुप्रिम कोर्टाने दिलेला निर्णय योग्य आहे.**



## संपादकीय...

## ‘जातनिहाय जनगणना’ ऐतिहासिक निर्णय

दीड वर्षापूर्वी बिहार सरकारने विधिमंडळात ठराव करून जातनिहाय सर्वेक्षण केले. त्यानुसार राज्यात ओबीसींची संख्या ६३ टक्के असल्याचे दिसून आले. बिहारमधील ओबीसींची संख्या राष्ट्रीय सरासरीपेक्षाही अधिक असल्याचे त्यातून स्पष्ट झाल्याने विरोधकांच्या जातनिहाय जनगणनेच्या मागणीला बळ मिळाले. देशात दर १० वर्षांनी जनगणना होते. पण १९३१ नंतर जातनिहाय जनगणना झालेली नाही. काँग्रेसप्रणीत यूपीए सरकारने २०११ मध्ये जनगणनेसोबतच सामाजिक-आर्थिक सर्वेक्षण केले होते. मात्र त्याचाही तपशील अद्याप उपलब्ध झालेला नाही. हा तपशील जाहीर करण्यासोबत २०२१ची प्रलंबित जनगणना जातनिहाय करावी, अशी मागणी पुढे आली होती. सध्या पहलगाम हल्ल्याला सडेतोड प्रत्युत्तर देण्याची व्यूहरचना आखली जात असतानाच केंद्र सरकारने आकस्मिकरीत्या जातनिहाय जनगणना करण्याची घोषणा करून, सर्वांनाच धक्का दिला. आगामी बिहार विधानसभा निवडणूक तोंडावर आली असताना, जातगणनेस मान्यता दिल्यामुळे बिहारमध्ये राष्ट्रीय जनता दल (राजद) व काँग्रेसपुढे नवे आव्हान तयार झाले आहे.

मुख्यमंत्री नितीशकुमार आणि राजदचे नेते लालूप्रसाद यादव हे जेव्हा एकत्र होते, त्याचवेळी त्यांनी जातनिहाय सर्वेक्षण केले होते आणि देशव्यापी जातगणनेची मागणीही केली होती. आजवर जनगणना करताना केवळ अनुसूचित जाती व जमातींची मोजणी केली जात असे. पण देशाच्या एकूण लोकसंख्येत ओबीसी, अतिमागास व उच्चवर्णीय जातींचे प्रमाण मोजले जात नसे. मात्र या जनगणनेमुळे उपेक्षित, मागास घटकांना समाजाच्या आणि त्यायोगे विकासाच्या मुख्य प्रवाहात येण्याची दारे उघडली जातील. सामाजिक समतोल साधल्याशिवाय प्रगतीचे अंतिम लक्ष्य साध्य होत नसते. त्यादिशेने पडलेले हे आशादायक पाऊल मानता येईल. घटनेच्या अनुच्छेद २४६च्या केंदीय सूचीतील अनुक्रमांक ६९ मध्ये जनगणनेचा स्पष्ट उल्लेख आहे. हा केंद्राचा विषय असला, तरी काही राज्यांनी जातींची गणना करण्यासाठी सर्वेक्षण केले. पण त्यात पारदर्शीपणा नव्हता.

जनगणनेमुळे समाजात कोणत्या जातीचे किती लोक आहेत, याची सविस्तर माहिती मिळेल. त्यामुळे प्रसंगी आरक्षणाची फेररचना आणि मांडणी करावी लागणार आहे. आरक्षण मर्यादा वाढवण्यावरही विचार करावा लागणार आहे. अनेक जातींना अजूनही आरक्षणाचा लाभ मिळत नाही, त्यांना तो देता येईल. स्वातंत्र्यानंतर काँग्रेसने काही वर्षे गेल्यावरही जातनिहाय जनगणना घेण्याचे टाळले. २०१० मध्ये तत्कालीन कायदा मंत्री वीरप्पा मोईली यांनी पंतप्रधान मनमोहन सिंग यांना पत्र लिहून, जातनिहाय जनगणनेची मागणी केली. त्यावेळी पंतप्रधानांच्या कार्यालयाने मोईली यांचे हे सूचनावजा पत्र जनगणना आयुक्तांकडे पाठवले. आयुक्तांनी ही मागणी फेटाळून लावली. त्यानंतर पुन्हा राजद, समाजवादी पार्टी, द्रमुक, जदयू या पक्षांनी तसेच भाजपमधील ओबीसी खासदारांनी अशीच मागणी केली. तेव्हा तत्कालीन गृहमंत्री पी. चिदंबरम यांनी या प्रक्रियेतील व्यावहारिक अडचणींचा पाढा वाचला. मात्र हे वास्तव असले, तरीही राहुल गांधी यांनी २०१३ पासून ते आजपर्यंत जातनिहाय जनगणनेची मागणी लावून धरली होती. कोणत्याही पक्षाच्या भूमिका बदलत असतात. काँग्रेसचाही पवित्रा तसाच बदलला. तसे पाहू गेले, तर रा. स्व. संघानेही जनगणनेचा राजकारणासाठी गैरवापर व्हायला नको, अशी भूमिका मांडली आहे. अशा जनगणनेची मागणी करून जाती-जातींमध्ये भेद निर्माण करणारे विभाजनवादी राजकारण काँग्रेस करत असल्याचा आरोप भाजपने केला होता.

आता ही जनगणना कधी सुरू करणार, याचे वेळापत्रक जाहीर करावे, अशी मागणी राहुल गांधी यांनी केली असून, आम्ही ५० टक्क्यांची आरक्षण मर्यादा हटवण्यासाठी भाजपवर दबाव टाकणार आहोत, असे त्यांनी म्हटले आहे. या निर्णयाचे काँग्रेसपासून ते मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षापर्यंत सर्वांनीच स्वागत केले आहे, हे महत्त्वाचे. काही परंपरावादी मंडळी जातगणनेमुळे जातिभेद वाढतील, अशी जी भीती व्यक्त करतात, त्याला काहीच अर्थ नाही. भारतातील जातवास्तव नाकारण्याचा उद्योग व्यवस्थेचे सर्व फायदे लाटणारेच करू शकतात! जातनिहाय जनगणना झाल्यावर, विकासप्रक्रियेत मागे राहिलेल्या वंचितांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शिक्षण, रोजगार, आरोग्य, कौशल्य प्रशिक्षण वगैरे आघाड्यांवर काय काय करता येईल व कोणत्या प्रमाणात याचा नक्की अंदाज येऊ शकेल. शोषित-वंचितांपैकी काही मोजक्याच जातींचे लोक सर्व फायदे लाटत आहेत की नाहीत, हेही कळेल. ही जनगणना प्रामाणिक व शास्त्रशुद्ध पद्धतीने व्हावी, एवढीच अपेक्षा.

## अशोक भैयांच्या वाढदिवसानिमित्य विद्यार्थी व रुग्णांना फळवाटप



ब्रह्मपुरी/का.प्र.

ब्रह्मपुरी येथील नेवजाबाई भैया हितकारिणी शिक्षण संस्थेचे सचिव तथा ब्रह्मपुरी नगराचे प्रथम नगराध्यक्ष अशोक किसनलालजी भैया यांच्या वाढदिवसानिमित्त विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले.

येथील ग्रामीण रुग्णालयातील रुग्णांना व स्व. मदनगोपालजी भैया येथील छात्रवासातील छात्रांना फळे वाटण्यात आले. यावेळी नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालयातील कार्य.प्राचार्य डॉ. सुभाष शेकोकर, शांताबाई भैया महिला महाविद्यालयचे प्राचार्य डॉ. वरभे सर, प्रा. मेजर विनोद नरड, डॉ. राजेंद्र डांगे, डॉ. रेखा मेश्राम, डॉ. किशोर नाकतोडे, डॉ. अरविंद मुंगोले, पर्यवेक्षक प्रा. आनंद भोयर, अधीक्षक संगीता ठाकरे यांचेसह संस्थेच्या अनेक कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला.

## ब्रम्हपुरी जिल्हा संघर्ष समितीच्या वतीने पहलगाम हल्ल्यातील मृतकांना श्रध्दांजली

ब्रम्हपुरी/का.प्र.

‘ब्रह्मपुरी जिल्हा झालाच पाहिजे’ या मागणीसाठी सातत्याने संघर्ष करणारे ब्रह्मपुरी जिल्हा निर्माण संघर्ष समितीच्या वतीने दिनांक १ मे जागतिक कामगार दिवस व महाराष्ट्र दिनानिमित्त स्थानिक विश्रामगृह येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.



या बैठकीला सुरुवात करण्याआधी भारताचे नंदनवन असलेल्या काश्मीर येथील पहेलगाम येथे दहशतवादी हल्ल्यात २६ नागरिकांचा मृत्यू झाला त्या मृतकांना भावपूर्ण श्रद्धांजली संघर्ष समितीच्या वतीने देण्यात आली. त्यानंतर जिल्ह्याच्या मागणीसाठी पुढील उपाय योजना आणि आंदोलनाची दिशा ठरवण्यासाठी साधक बाधक चर्चा करून मुख्यमंत्री व महसूल मंत्री यांना शिष्टमंडळादवारे निवेदन देणे, जून महिन्यात संघटनेची विस्तारीत बैठक घेऊन उपविभागीय अधिकारी यांना निवेदन देणे, जुलै महिन्यात धरणे आंदोलन करणे व ऑगस्ट महिन्यात विद्यार्थांच्या सहभागाने विशाल मोर्चा काढून सरकारचे लक्ष वेधून घेणे असे सर्वानुमते नियोजन करण्यात आले.

या बैठकीचे अध्यक्ष स्थान जिल्हा निर्माण संघर्ष समितीचे मार्गदर्शक डॉ.देविदास जगनाडे सर यांनी भुषविले. यावेळेस जिल्हा निर्माण संघर्ष समितीचे मुख्य निमंत्रण विनोद झोडगे पाटील, निमंत्रक प्रशांत डांगे, सुयोग बाळबुध्दे, रक्षित रामटेके, हर्षद निनावे, दत्तू टिकले, सुरज विखार व अन्य पदाधिकारी उपस्थित होते.

## ०१ मे, महाराष्ट्र दिन उत्साहात साजरा



ब्रम्हपुरी/का.प्र.

दि. १ मे २०२५ला महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी बेटाला, ब्रम्हपुरी येथे महाराष्ट्र दिनानिमित्त महाविद्यालयाचे संस्थापक देवेंद्रजी पिसे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. या वेळेस महाविद्यालयाचे प्राचार्य सचिन दुधे, प्राचार्य सुयोग बाळबुद्धे व प्राचार्य विशाल लोखंडे आणि सर्व प्राध्यापक गण आणि शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच बहुसंख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

या प्रसंगी राष्ट्रीय सेवा योजनेचे अधिकारी प्रा. श्रीकांत महाजन व स्वयंसेवक तसेच शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी स्वच्छ भारत अभियान अंतर्गत महाविद्यालय परिसराची स्वच्छता केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रीतम वैद्य यांनी केले.

## विनोदिनी

चार जुआरियों को अदालत में पेश किया गया...

पहला : साहब मैं उस दिन यहाँ था ही नही सबूत के तौर पर अपने ट्रेवल एजेंट से ली रेल टिकट की रसीद सबूत के तौर पर पेश की...

दूसरा : साहब उस दिन मैं बुखार से पीड़ित था.. यह रहा मेरा डाक्टर का प्रमाण पत्र...

तिसरा : साहब मैं एक सरकारी मुलाजम हूं यह रहा मेरा हाजरी रजिस्ट्रर, मैं उस दिन ड्यूटी पर था...

चौथा : चुपचाप खड़ा रहा। मजिस्ट्रेट ने उससे पुछा अब तुम बताओ कि तुम भी जुआ नही खेल रहे थे?

चौथा जुआरी : साहब आप नें कभी जुआ खेला है?

मजिस्ट्रेट : नहीं, पर यह तुम मुझ से क्यों पूछ रहे हो... सबूत दो सबूत, कानून सिर्फ सबूत मांगता है,

चौथा जुआरी : साहब अब आप ही बता दो कि अकेला आदमी जुआ कैसे खेल सकता है....?

# एलएमबी पब्लिक स्कुलमध्ये ग्रीष्मकालीन शिबीराचे उद्घाटन

ब्रम्हपुरी/का.प्र.

शिक्षणाचे माहेरघर समजल्या जाणाऱ्या ब्रम्हपुरी शहरातील नेवजाबाई भैया हितकारिणी शिक्षण संस्थेतील एक शाखा म्हणजेच एल.एम.बी. पब्लिक स्कूल हे नामांकित विद्यालय होय. या विद्यालयामार्फत वेळोवेळी विद्यार्थ्यांसाठी अनेक उपक्रम राबविण्यात येतात. तीच परंपरा कायम राखीत ०२ मे २०२५ ते ०८ मे २०२५ या कालावधीसाठी ग्रीष्मकालीन शिबिराचे summer camp चे आयोजन करण्यात आले.



या शिबिरात मुलांसाठी विविध मनोरंजक आणि शैक्षणिक कार्यक्रम आयोजित केले आहेत. या उन्हाळी शिबिरांमुळे मुलांना नवनविन गोष्टी शिकायला मिळतात. प्रशिक्षण शिबिरातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधण्यास मदत होते. मुलांमधील सृजनशक्ती व कलात्मक वृत्तीचा विकास व्हावा यासाठी या शिबिराचे आयोजन करण्यात आले. नवीन गोष्टी आत्मसात करण्याची, शिकण्याची वृत्ती व आवड, कौशल्य विकास वृत्ती विद्यार्थ्यांमध्ये निर्माण व्हावी हा या शिबिराचा मुख्य उद्देश आहे. या ग्रीष्मकालीन शिबिरामध्ये विद्यार्थ्यांना शुभेच्छाकार्ड Clay models, Swan making activity, Pen stand,, Bird feeder, resin art, Dream catcher इ. उपक्रम घेत आहेत. यासोबतच विद्यार्थ्यांना नृत्यशिक्षण, योग व ध्यानधारणाही शिकविण्यात येत आहे.

सोबतच विद्यार्थ्यांच्या मनोरंजनासाठी विविध indoor व outdoor fun games चे आयोजन केले आहे. विद्यार्थ्यांची जिज्ञासू वृत्ती वाढावी. वैज्ञानिक दृष्टीकोन विकसीत व्हावा यासाठी indoor science activity चे आयोजन केले आहे. मुलांचा सर्वांगिण विकास व्हावा यासाठी त्यांना भोजनाचे महत्त्व व त्याबाबत योग्य सवयी शिकविण्यात येतील. त्याचबरोबर व्यक्तीमत्व विकास शिबिराचे देखील आयोजन केले आहे.

या शिबिराचे उद्घाटन स्कुलच्या संचालिका अशिता भैया मॅडम यांच्या हस्ते पार पडले. या प्रसंगी एल. एम. बी. पब्लिक स्कूलचे मुख्याध्यापक कादिर कुरेशी सर, उपमुख्याध्यापिका रश्मी राठी मॅडम, पर्यवेक्षिका रश्मी झोडे मॅडम, समस्त शिक्षकवृंद व कर्मचारीगण उपस्थित होते. उद्घाटन कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उर्मिला खेवले मॅडम व श्यामली मेने मॅडम यांनी केले.

# शिष्यवृत्ती परिक्षेत ने.हि. कन्या विद्यालयाच्या विद्यार्थीनींचे सुयश



ब्रम्हपुरी/का.प्र.

नेवजाबाई हितकारिणी कन्या विद्यालय ब्रह्मपुरी येथील वर्ग पाचवीची विद्यार्थिनी कु. जिया सचिन झरकर तसेच वर्ग आठवीच्या कु. राजश्री संजय आंबोरकर, कु. अक्षरा अमित मेश्राम यांनी महाराष्ट्र शासन आयोजित शिष्यवृत्ती परीक्षेत यश संपादन करून विद्यालयाच्या नावलौकिक वाढवला आहे.

विशेष म्हणजे राजश्री आंबोरकर हिने नुकत्याच झालेल्या एनएमएमएस स्कॉलरशिप परीक्षेत शिष्यवृत्ती मिळवली आहे. सदर शिष्यवृत्ती ही विद्यार्थिनींना सलग तीन वर्षे मिळणार असून विद्यार्थीनींच्या उल्लेखनीय कामगिरीचे सर्वत्र कौतुक होत आहे. या यशानिमित्य संस्थेचे सचिव अशोकजी भैया सर, मुख्याध्यापिका पी.व्ही. बनपुरकर, उपमुख्याध्यापक निखारे सर, पर्यवेक्षिका खंडाते मॅडम तसेच सर्व शिक्षक वृंद यांनी विद्यार्थिनींचे हार्दिक अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

विद्यार्थिनींनी आपल्या यशाचे श्रेय आई-वडील व विद्यालयातील शिक्षकांचे प्रभावी मार्गदर्शन यांना दिले आहे. नुकत्याच झालेल्या एनएमएमएस परीक्षेत नऊ विद्यार्थिनींची स्कॉलरशिपसाठी व शिष्यवृत्ती परीक्षेत तीन विद्यार्थिनींनी मिळवलेल्या सुयशामुळे विद्यालयात प्रेरणादायी व उत्साहाचे वातावरण निर्माण झालेले आहे.

✿✿✿✿✿✿

# पहलगाम हल्ल्यातील मृतकांना सर्वपक्षीय श्रध्दांजली

ब्रम्हपुरी/का.प्र.

भारताचे नंदनवन असलेल्या काश्मीर येथील




पहेलगाम येथे दहशतवादी हल्ल्यात २६ नागरिकांचा मृत्यू झाला. त्या मृतांना सर्वपक्षीय भावपूर्ण श्रध्दांजली कार्यक्रम रिपब्लिकन पक्ष खोरीपा यांच्या वतीने स्थानिक बॅरिस्टर राजाभाऊ खोब्रागडे चौक येथे घेण्यात आला. रिपब्लिकन पक्ष खोरीपा महा.प्रदेश सरचिटणीस जीवन बागडे यांच्या अध्यक्षतेखाली श्रध्दांजली कार्यक्रम घेण्यात आला. सर्वप्रथम विविध पक्षांच्या पदाधिकाऱ्यांनी शोक संवेदना व्यक्त करून श्रध्दांजली अर्पण केली. यामध्ये राजू भागवत भाजपा ओ.बी.सी. मोर्चा शहर, सुधाकर पोपटे कॉंग्रेस, रवी पवार कॉंग्रेस, राहुल भोयर पत्रकार तथा ओबीसी युवा नेते, पदमाकर रामटेके रिपब्लिकन पक्ष खोरीपा, डेव्हिड शेंडे समता सैनिक दल, नागेश चहांदे यांनी मनोगत व्यक्त केले. त्यानंतर अध्यक्ष जीवन बागडे यांनी अध्यक्षीय स्थानावरून आपल्या भावना व्यक्त केल्या. यावेळी नरेश रामटेक, नागेश फुले, रक्षित रामटेके, मनोज धनविज, मदन शेंडे, आशू हुमने, जयंत चहांदे, देवानंद कांबळे आदी विविध पक्षाचे कार्यकर्ते उपस्थित होते.

# नागभीड येथे विज्ञान संस्कार शिबीराचा समारोप

नागभीड/प्रतिनिधी

समिधा सेवा संस्था द्वारा संचालित श्रीमती रामप्यारीदेवी आसारामजी काबरा ट्विंकल



इंग्लिश स्कूल नागभीड येथे सुरू असलेल्या विज्ञान संस्कार शिबिराचे समारोप कार्यक्रम दि. ४ मे २०२५ रोजी झाला. समारोपिय कार्यक्रमास बिंटेलिजेंडचे संस्थापक प्रा. संकेत जोशी, वि.भा.च्या कोर मेम्बर अनुजा मैत्रे, रमेशकुमार ढोके, कर्मवीर विद्यालयच्या प्रा. प्रतिभा कायरकर, समिधा सेवा संस्थेचे अध्यक्ष गणेश तर्वेकर, सचिव अजय काबरा, प्राचार्या शुभांगी पोहेकर, मुख्याध्यापिका संगीता नारनवरे उपस्थित होत्या.

सदर शिबिरात ७ दिवस विद्यार्थ्यांना विज्ञान विषयातील २५ विविध प्रात्यक्षिके करून प्रशिक्षण व मार्गदर्शन देण्यात आले. २७ एप्रिल पासून स्थानिक ट्विंकल इंग्लिश स्कूल येथे सुरू असलेल्या या शिबिराचे उद्घाटन प्राचार्य डॉ. अमीर धम्माणी यांच्या शुभहस्ते पार पडले. या शिबिरात तालुक्यातील कर्मवीर विद्यालय, जनता कन्या, जनता बॉईज , सरस्वती ज्ञान मंदिर, ट्विंकल इंग्लिश स्कूल सह अनेक शाळेतील ७ वी ते ९वीच्या विद्यार्थांचा सहभाग होता.

कार्यक्रमाचे उत्कृष्ट संचालन शिक्षिका कु. रुचिता पेटकर व शिक्षिका कु. फरीन शेख यांनी केले तर आभार प्रदर्शन शिबिर संयोजक शिक्षक दिपक कावडकर, शिक्षक राजीव खिब्रागडे यांनी केले. यावेळी विज्ञान भारतीच्या सर्व उपस्थित पदाधिकाऱ्यांचा ट्विंकल इंग्लिश स्कुलच्या वतीने सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला .

**बातम्या व जाहिरातींसाठी संपर्क साधा**

: कार्यालय पत्ता :
गाडगे बाबा स्मारकासमोर,
विद्यानगर, ब्रम्हपुरी

: जाहिरातींसाठी संपर्क :
महेश पिलारे मो. ९५०३७००९६४
प्रा. विजय मुडे सर मो. ८२७५७७५३९५

# भंडारा-गडचिरोली समृध्दी महामार्ग जमीन अधिग्रहणाविरोधात शेतकरी आक्रमक

ब्रम्हपुरी/का.प्र.

आपल्यावरील होणाऱ्या अन्यायाच्या विरोधात बाधित शेतकरी एकत्रित येऊन मोठ लढा उभारण्यासाठी विनोद झोडगे पाटील यांच्या नेतृत्वात सार्वजनिक बांधकाम विभागचे विश्राम गृह ब्रम्हपुरी येथे दिनांक ५ मे २०२५ रोजी शेतकऱ्यांची बैठक घेण्यात आली. यावेळी मुख्य मार्गदर्शक डॉ.महेश कोपुलवार राज्य कार्याधक्ष अखिल भारतीय किसान सभा, डॉ.खुणे, प्रा तुळशीराम तलमले, आशिष शहारे, अशोक ठेंगरी उपस्थित




होते.

शेतकऱ्यांवर कदापी अन्याय होऊ देणार नाही. जो पर्यंत शेतकऱ्यांच्या मागण्या पूर्ण होणार नाही, तो पर्यंत अनेक आंदोलने करून आम्ही शेतकऱ्यांच्या पाठीशी राहु, असे मुख्य मार्गदर्शक डॉ. महेश कोपुलवार कार्याध्यक्ष अखिल भारतीय किसान सभा यांनी उपस्थित शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले.महाराष्ट्र महामार्ग अधिनियम १९५५ नुसार सदर महामार्ग तयार होत असल्याने मिळणारा मोबदला शेतकऱ्यांना अतिशय कमी असणार आहे रेकॉर्ड नुसार दोन पट असणार आहे. शेतकऱ्यांच्या सुपीक जमिनी या महामार्गाला वापरून सरकार शेतकऱ्यांना उध्वस्त करणार आहे. सदर महामार्ग भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली जिल्ह्यातील सर्वसामान्य जनतेसाठी उपयोगाचा नाही फक्त गडचिरोली जिल्ह्यातील प्रस्तावित २५ खाणींचा कच्चा माल इतर राज्यात नेण्यासाठी सदर द्रुतगती महामार्गाचा वापर सरकार करणार असल्याचे स्पष्ट होत आहे. सदर मार्गासाठी संपादित होणाऱ्या शेतकऱ्यांच्या जमिनी जाणार आहेत परंतु याचा फायदा भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली येथील सामान्य जनतेला होणार नाही हे स्पष्ट आहे.

प्रसंगी सरकारच्या शेतकरीविरोधी धोरणाविरुद्ध लढा उभारण्यासाठी, आपल्या हक्क, अधिकारासाठी बाधित शेतकऱ्यांनी संघटित राहून लढा तीव्र करण्याचे आवाहन विनोद झोडगे यांनी केले आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चुन्नीलाल मोटघरे यांनी तर आभार प्रदर्शन गजानन गडे यांनी केले.

# सर्वांना सांभाळून समतोल साधणारे प्राचार्य डॉ. गहाणे

## निरोप व सत्कार समारंभात अशोक भैया यांचे प्रतिपादन

ब्रह्मपुरी/का.प्र.

'आपण या पृथ्वीवर एक भ्रमणकर्ता म्हणून आलो आहोत. 'कर भला तो अंत भला' उत्तम



कार्य केले तर शेवटही चांगला होतो, हे निश्चित. प्राचार्य डॉ. डी.एच.। गहाणेंनी महाविद्यालयाला एक दिशा दिली. ते उत्तम शिक्षक, चांगले प्राचार्य म्हणून त्यांची कारकीर्द राहिली. सर्वांना सांभाळून समतोल साधणारे प्राचार्य डॉ.गहाणे होते', असे विवेचन नेवजाबाई भैया हितकारिणी शिक्षण संस्थेचे सचिव अशोकजी भैयांनी केले. ते नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालयातील प्राचार्य डॉ. डी.एच. गहाणेंच्या निरोप व सत्कार समारंभात बोलत होते.

विचारपीठावर अध्यक्षस्थानी संस्थेच्या अध्यक्ष स्नेहलताताई भैया होत्या तर प्रमुख अतिथीत सहसचिव ॲड. भास्करराव उराडे, कोषाध्यक्ष राकेश कऱ्हाडे, ज्येष्ठ सदस्य प्रा. सुभाष बजाज, प्रशांत भैया, गोपाल भैया, उपप्राचार्य डॉ. सुभाष शेकोकर, प्राचार्य डॉ. वरभे, प्रा. विनोद नरड, सत्कारमूर्ती प्राचार्य डॉ. डी.एच. गहाणे, सौ.अंजली गहाणे, समितीध्यक्ष डॉ. रतन मेश्राम इत्यादी मान्यवर उपस्थित होते. पाहुण्यांच्या हस्ते प्राचार्य डॉ. डी.एच. गहाणेंचा सपत्नीक सत्कार महाविद्यालयातर्फे व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांतर्फे करण्यात आला. यानंतर डॉ. धनराज खानोरकरांनी सन्मानपत्राचे प्रभावी वाचन केले. उपस्थितांची भाषणे झालीत. अधीक्षक संगीता ठाकरे, डॉ. राजेंद्र डांगे, डॉ. रेखा मेश्राम, प्रा. रुपेश वाकोडीकरांनी मनोगत व्यक्त केले. अध्यक्षीय भाषणात स्नेहलताताई भैया म्हणाल्या, 'प्राचार्य डॉ गहाणेंनी महाविद्यालयाला प्रदीर्घ सेवा दिली. विकास केला, त्या कौशल्याचा पुढे फायदा होईल.'

कार्यक्रमाचे संचालन डॉ. मोहन कापगते, सत्कारमूर्तीचा परिचय डॉ. ज्योती दुपारे तर डॉ. रतन मेश्रामांनी आभार व्यक्त केले. कार्यक्रमाला सत्कारमूर्तीचे आप्तस्वकीय, महाविद्यालयाचे कर्मचारी उपस्थित होते.

# पक्ष्यांसाठी जलपात्र तयार करून त्याचे वाटप

ब्रम्हपुरी/का.प्र.

ब्रम्हपुरी येथील उष्णतामान जगात उच्यांकावर आहे. उन्हाळ्यात पक्ष्यांना तहान भागविण्यासाठी सहजपणे पाणी उपलब्ध व्हावे, नागरिकांमध्ये विशेषतः लहान मुलामंध्ये पक्षी संवर्धन आणि संरक्षणाची भावना निर्माण व्हावी या उद्देशाने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा क्र. ३ ब्रम्हपुरी येथील पाच विद्यार्थ्यांना मनोहर वरवाडे यांनी जलपात्राचे वाटप केले. यावेळेस मुख्याध्यापिका के. एन. खोब्रागडे, शिक्षिका प्रियंका मेश्राम, तुळशीदास तलमले, कैलास मेश्राम आणि विद्यार्थी उपस्थित होते.



तसेच गोसिखुर्द उजवा कालवा उपविभाग क्र. ५ ब्रम्हपुरी येथील खेड वसाहतीमध्ये चार ठिकाणी झाडांना जलपात्र बांधले. जलपात्रात पाणी टाकण्याची जबाबदारी वसाहतीतील कर्मचारी कैलास मेश्राम यांनी स्वीकारली असून मनोहर वरवाडे यांच्या कार्याबद्दल त्यांचे कौतुक होत आहे.

## ... QUOTES ...

**"The basic idea underlying religion is to create an atmosphere for the spiritual development of the individual."**

**- Dr. B.R. Ambedkar**

## चा रो ळी

*पोरावर 100 टक्के करतेस प्रेम*
*सुनेचा मात्र दुस्वास करतेस...*
*चांगली आई असून सुध्दा,*
*सासू म्हणून एटिकेटी ठरतेस...*

रचनाकार : डॉ. राजन जयस्वाल

- ब्रम्हपुरी समाचारमध्ये
जाहिरात प्रसिध्दीसाठी संपर्क करा -
महेश पिलारे मो. 9503100964
प्रा. विजय मुडे सर मो. 8275715315

# बालाजी राईस प्रॉडक्ट प्रा.लि.च्या कर्मचाऱ्यांच्या वतीने अशोक भैया यांचा वाढदिवस साजरा



ब्रम्हपुरी/का. प्र.

ब्रह्मपुरी नगरपालिकेचे प्रथम नगराध्यक्ष, नेवजाबाई भैया हितकारिणी शिक्षण संस्थेचे सचिव, हजारों हातांना रोजगार देणारे प्रसिद्ध उद्योजक अशोकजी भैया यांचा वाढदिवस बालाजी राईस प्रॉडक्ट प्रायव्हेट लिमिटेड कुर्झा येथील कार्यालयात कर्मचाऱ्यांच्या वतीने मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी बालाजी राईस प्रॉडक्ट प्रायव्हेट लिमिटेड कुर्झा येथील कर्मचाऱ्यांनी कार्यालयाची सुंदर सजावट केली होती. बालाजी राईस प्रॉडक्ट प्रायव्हेट लिमिटेड कुर्झाचे संचालक अशोक भैय्या यांच्या हस्ते केक कापून वाढदिवस मोठ्या हर्षोल्हासात साजरा करण्यात आला. प्रसंगी येथील संपूर्ण कर्मचाऱ्यांनी अल्पोपहाराचा आस्वाद घेतला. यावेळी बालाजी राईस प्रॉडक्ट प्रायव्हेट लिमिटेड कुर्झा येथील कर्मचारी उपस्थित होते.

# एलएमबी पब्लिक स्कुलच्या वतीने अशोक भैया यांचा वाढदिवस उत्साहात साजरा

ब्रम्हपुरी/का. प्र.

एल. एम. बी. पब्लिक स्कुल ब्रम्हपुरीच्या वतीने नेवजाबाई भैया हितकारिणी शिक्षण संस्थेचे सचिव मा. अशोकजी भैया



सर यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला. यावेळी श्रीमती स्नेहलता भैया मॅडम, अशोकजी भैया सर, सौ. सुनिता भैया मॅडम, गौरवजी भैया सर, संचालिका अशिता भैया मॅडम, जतिन राठी सर, रूचिता राठी मॅडम संपूर्ण परिवार उपस्थित होते. तसेच मुख्याध्यापक कादिर कुरेशी सर, उपमुख्याध्यापिका रश्मी राठी मॅडम, पर्यवेक्षिका रश्मी झोडे मॅडम, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

मा. अशोकजी भैया सर यांची प्रशासक, कला-कुशल, निपूण व्यक्तिमत्व, यशस्वी राजकीय नेता, सफल उद्योगपती, शिक्षण महर्षी तसेच उदार व्यक्तिमत्वाचे धनी अशी ख्याती आहे. शिक्षणाचे दरवाजे सर्वसामान्यांसाठी उघडण्याऱ्या स्व. मदनगोपालजी भैया यांचा वारसा त्यांना लाभला आहे. त्यांचा वारसा पुढे चालवित अशोकजी भैया सर यांनी संस्थेला यशोशिखरावर पोहचविले. याच संस्थेची शाखा एल. एम. बी. पब्लिक स्कूलमध्ये त्यांच्या अभूतपूर्व शैक्षणिक योगदानाचे ऋण फेडण्यासाठी त्यांचा जन्मदिवस सोहळा आयोजित करण्यात आला. याप्रसंगी यांचे औक्षवण करून केक कापून वाढदिवस साजरा करण्यात आला व भेटवस्तू देण्यात आली.

या प्रसंगी मा. अशोकजी भैया सर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. त्याचप्रमाणे सौ. सुनिता भैया मॅडम यांनी सुद्धा आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी मा. अशोकजी भैया सर यांच्या चेहऱ्यावर आनंद स्पष्ट दिसून येत होता.

स्कुलचे प्राचार्य श्री. कादिर कुरेशी सर यांनी अशोकजी भैया सर यांच्या वाढदिवसा निमित्य आवडत्या गायकाचे गीत गाऊन शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन दानिश शेख सर यांनी केले. अशा प्रकारे मा. अशोकजी भैया सर यांचा ६४ वा वाढदिवस साजरा करून भोजनाचा आस्वाद घेण्यात आला.




सोरते
प्रो.प्रा. सुरेश सोरते
मो. 8698323337
स्टेनलेस स्टील वर्क्स



गीत (बुरले) पेट्रोल पंपसमोर
नागभीड रोड, ब्रम्हपुरी
रेलींग, ग्रिल व गेट
स्टिलचे नावे बनवून मिळेल.



# ब्रम्हपुरी तालुका विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाची ग्रामीण व शहर कार्यकारिणी गठीत

ब्रम्हपुरी/का.प्र.

विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे प्रांतीय सहकार्यवाह तथा नागपूर विभागाचे शिक्षक आमदार सुधाकरराव अड्बाले यांचे मार्गदर्शनाखाली नेवजाबाई हितकारिणी कन्या विद्यालय येथे सोमवारला सभेचे आयोजन करण्यात आले होते.

त्यात ब्रम्हपुरी तालुका ग्रामीण कार्यकारिणी अध्यक्षपदी कमलेश उंदिरवाडे, उपाध्यक्ष दिलीप साखरे, सुधीर राउत, चंद्रपाल माकडे, कु. तारिका धोटे, कार्यवाह श्रीहरी ठेंगरे यांची निवड करण्यात आली. तर ब्रम्हपुरी तालुका शहर कार्यकारिणीमध्ये अध्यक्ष पदी अविनाश म्हस्के सर, उपाध्यक्ष जितेंद्र बेले, राजू काळूसे , माया कापगते , कु. सुरेखा कावळे, कार्यवाह पदी अतुल कानझोडे यांची निवड करण्यात आली. संचालन हटवार सर यांनी तर म्हस्के सर यांनी आभार मानले.

## एचएससी परिक्षेत ने.हि. महाविद्यालयाची...

(पान क्र. १ वरून)

विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

ब्रम्हपुरी तालुक्यातील २२३२ विद्यार्थ्यांपैकी २२३२ विद्यार्थ्यांनी परिक्षा दिली होती. परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांपैकी २०३२ विद्यार्थी इयत्ता १२ वी ची परीक्षा उत्तीर्ण झाले असून यात प्राविण्य श्रेणीमध्ये ५७ विद्यार्थी, प्रथम श्रेणीमध्ये ३०४ तर द्वितीय श्रेणीमध्ये १०५२ व पास श्रेणीमध्ये ६१९ विद्यार्थ्यांचा समावेश आहे. ब्रम्हपुरी तालुक्याचा इयत्ता १२ वी चा निकाल ९१.२८ टक्के इतका लागला आहे. ब्रम्हपुरी तालुक्यातून खिस्तानंद ज्यु. कॉलेजचा निकाल १०० टक्के लागला आहे.

ब्रम्हपुरी तालुक्यातील महाविद्यालय निहाय निकाल - ने.हि. महाविद्यालय ब्रम्हपुरी विज्ञान शाखा-९९.५४ टक्के, कला शाखा९६.४७ टक्के, वाणिज्य शाखा-९५.२९ टक्के, एकुण निकाल- ९७.९५ टक्के, **डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, ब्रम्हपुरी** विज्ञान शाखा-९७.०५ टक्के, कला शाखा- ८१.८१टक्के, वाणिज्य शाखा-९३.०२टक्के एकुण निकाल-९१.९४ टक्के, **लोकमान्य टिळक कनिष्ठ महाविद्यालय ब्रम्हपुरी** विज्ञान शाखा-१००टक्के, कला शाखा-९२.४२ टक्के, एकुण निकाल-९६.४० टक्के, **नेवजाबाई हितकारिणी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय ब्रम्हपुरी** कला शाखा-९१.६६ टक्के, एकुण निकाल-९१.६६ टक्के, **कृषक ज्यु. कॉलेज चौगान** विज्ञान शाखा- ९८.३३ टक्के, कला शाखा- ७४ टक्के, एकुण निकाल- ८३.१२ टक्के, **ज्ञानोपासक ज्यु. कॉलेज निलज** कला शाखा-८९.४७ टक्के, एकुण निकाल-८९.४७ टक्के, **लोक ज्यु. कॉलेज गांगलवाडी** कला शाखा-६७.०१ टक्के एकुण निकाल-६७.०१ टक्के, **डॉ. पंजाबराव देशमुख कन्या ज्यु. कॉलेज** कला शाखा- ६८ टक्के, एकुण निकाल - ६८ टक्के, **महात्मा फुले ज्यु. कॉलेज मेंडकी** - कला शाखा- ७५ टक्के, एकुण निकाल- ७५ टक्के, **कर्मवीर कला क. महाविद्यालय, मुडझा** कला शाखा-९२.६ टक्के, एकुण निकाल-९२.६ टक्के, **कर्मवीर कन्नमवार क. महाविद्यालय सुरबोडी** कला शाखा-८२.५ टक्के, एकुण निकाल-८२.०५ टक्के, **खिस्तानंद कनिष्ठ महाविद्यालय ब्रम्हपुरी** - विज्ञान शाखा-१०० टक्के, एकुण निकाल- १०० टक्के, **अनुदानित उच्च माध्यमिक विद्यालय, ब्रम्हपुरी** विज्ञान शाखा-९७.२९ टक्के, कला शाखा-९१.८९टक्के, एकुण निकाल-९४.५९ टक्के, **मारोतराव बन्सोड ज्यु. कॉलेज खेडमक्ता** - कला शाखा-४२.१० टक्के, एकुण निकाल-४२.१० टक्के, **ने.हि. ज्युनिअर कॉलेज** एम.सी.व्हि.सी. शाखा ८२.६० टक्के, एकुण निकाल ८२.६० टक्के इतका तालुका निहाय निकाल लागला आहे.

## 'सिध्दी'ला व्हायचं आहे सी.ए.

(पान क्र. १ वरून)

भर देत अभ्यास करण्यास सुरुवात केली. जेव्हा अभ्यास करायचा मन झालं, त्या वेळेस अभ्यास करायचं या नेमाने तिने अभ्यास करून हे यश संपादन केले आहे. याकामी तिला आई-वडिलांचे प्रोत्साहन व महाविद्यालयाचे प्राचार्य व प्राध्यापकांचे मार्गदर्शन लाभले. सिद्धी पटेल हिला प्रथम पदवी प्राप्त करायची आहे, त्यानंतर ती सीए किंवा स्पर्धा परिक्षेतून अधिकारी व्हायचे तिचे स्वप्न ती पूर्ण करणार आहे. तिचे वडील अशोक पटेल हे वूड व्यवसायीक आहेत; तर आई गृहिणी आहे.

**जल है तो कल है...**

बुधवार बंद
- दुकानाची वेळ - सकाळी १० ते सायं. ६ वा.
सी.आर.आय. मोटारपंपचे विदर्भातील प्रथम अधिकृत विक्रेता
गणेश ॲग्रीकल्चरल एजन्सी
रेल्वे स्टेशन रोड, खानोरकर भवन, भगतसिंग चौक, ब्रम्हपुरी
फोन नं. (07177) 272573 मोबाईल क्र. 9423115853, 7083214053
ISO : 9001 : 2015 मानांकन प्राप्त दुकान
1994 पासून आपल्या सेवेत
किर्लोस्कर, एनसंस, लुबी, मोटार पंप, उषा, होन्डा, कॉमेट इंजीन, राज पी.व्ही.सी. पाईप, स्प्रिंकलर पाईप, आटा चक्की, हॅण्डपंप, केबल वायर व स्पेअर पार्टचे विक्रेता

Printed by Rajiv Pachpor published by Ashok Kisanlalji Bhaiya on behalf of Ashok Kisanlalji Bhaiya and printed at Aqua Process, Modi No.1, Sitabuldi, Nagpur and Published at Bramhapuri Samachar Office, Wadsa Road, Bramhapuri Editor Ashok Kisanlalji Bhaiya MAHMUL/2016/69789 Mob. 9422135404